**Press Note**

# महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित

**(सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग)**

**मुख्य कार्यालय जुहू सुप्रिम शॉपिंग सेंटर, गुलमोहर क्रॉस रोड नं.९, जे.व्ही.पी.डी.स्कीम,जुहू, मुंबई-४०००४९.**
**दुरध्वनी क्र.२६२००३५१/२६२०२८५२ फॅक्स क्र. ०२२-२६७०५१७३** *E-mail: mahatma.phule@yahoo.in*

एनएसएफडीसी नवी दिल्ली यांच्या माध्यमातून महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ यांच्यामार्फत कोविड-१९ या जागतिक महामारीत अनुसूचित जातीच्या कुटुंबप्रमुखाचा मृत्यु झाला आहे. त्या कुटुंबियाचे पुनर्वसन करण्यासाठी and Support for Marginalized Individuals for Livelihoods Enterprie (SMILE) ही व्यवसायासाठी कर्ज देण्याची योजना विचाराधीन आहे.
सदर योजनेची माहीती आणि अटी व शर्ती पुढील प्रमाणे आहे.

| तपशील / प्रकल्प मूल्य | एनएसएफडीसी सहभाग | भाडंवल अनुदान | व्याजदर | परतफेडीचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| रुपये १.०० लाखा ते ५.०० लाखा पर्यंत | ८०% | २०% | ६% | ६ वर्ष |

**पात्रता :-**

१) अर्जदार अनुसूचित जातीतील असावा.
२) अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न रुपये ३.०० लाख पर्यंत असावे.
३) अर्जदार हा कोरोनामुळे मृत्यु पावलेल्या कुटुंब प्रमुखाच्या कुटुंबातील सदस्य असावा ( कुटुंब प्रमुखाच्या रेशनकार्डवर सदर सदस्याचे नाव असणे बंधनकारक )
४) मृत्यु पावलेल्या व्यक्तीची वयोमर्यादा १८ ते ६० च्या दरम्यान असावी. मृत्यु पावलेल्या कुटुंब प्रमुखाची मिळकत कुटुंबाच्या एकूण मिळकतीपेक्षा जास्त असणे आवश्यक आहे.
५) कोरोनामुळे मृत्यु पावलेल्या व्यक्तींकरिता पुढील पैकी एक दस्तावेज आवश्यक आहेत.
अ) महानगर पालिका/नगरपालिका यांनी दिलेले मृत्यु प्रमाणपत्र
आ) स्मशानभूमी प्राधिकारणारे दिलेली पावती
इ) एखादया गावात स्मशानभूमी नसल्यास गट विकास अधिकाऱ्याने दिलेले मृत्यु प्रमाणपत्र

**आवश्यक कागदपत्रे :-**

१) मयत व्यक्तीचे नाव पत्ता २) आधारकार्ड ३) उत्पनाचा दाखला (३.०० लाखा पर्यंत)
४) कोविड-१९ मुळे मरण पावलेल्या व्यक्तीचा मृत्युचा दाखला ५) रेशन कार्ड
६) वयाचा पुरावा

कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे १५ जून २०२१ पर्यंत मृत्यु झालेल्या अनुसूचित जातीतील (SC) कुटुंबातील व्यक्तीने उपरोक्त वरील माहीती महामंडळाच्या जिल्हा कार्यालयात अथवा हया लिंकवर https://forms.gle/7mG8CMecLknWGt6K7 दिनांक ३०/०६/२०२१ पर्यंत भरण्यात यावी.

**जिल्हा व्यवस्थापक,**

**प्रति,**
जिल्हा माहिती व जनसंपर्क आधिकारी,

D:\Jetithor\Jadhav Madam\MARATHI NOTING